महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर | https://jeevandeepvarta.com | मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे | Rs.2/-

गुरुवार ■ 23 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 209 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# जीव वाचविताना 'जीव' गेले !

## आगीच्या अफवेने जळगावमध्ये मोठी रेल्वे दुर्घटना

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**जळगाव :** बंगळुरू एक्सप्रेसच्या धडकेत जळगावजवळील परधाडे रेल्वे स्थानकाजवळ 8 ते 10 प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीषण दुर्घटना घडली. न घडलेल्या घटनेच्या अफवेने क्षणात घात केला अन् 8 ते 10 कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला. जळगावहून मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्सप्रेसला आग लागल्याच्या भीतीने काही प्रवाशांनी चालत्या गाडीतून उड्या मारल्या. मात्र, त्याचवेळी समोरुन येणाऱ्या बंगळुरु एक्सप्रेसच्या खाली चिरडल्याची या प्रवाशांचा दुर्दैवी अंत झाला. जळगावमधील परधाडे स्टेशनजवळ हा भीषण अपघात घडला असून रेल्वे पटरीजवळ प्रवाशांचे मृतदेह पडल्याचं पाहायला मिळालं. या दुर्दैवी घटनेनं सर्वत्र हळहळ होत असून केवळ एका अफवेनं घात गेला अन् क्षणात 8 ते 10 कुटुंबीयांवर मोठं दु:ख कोसळलं. अपघातानंतर ट्रेन रेल्वे स्थानकावर थांबली असून प्रवाशांनी खाली उतरुन मोठी गर्दी केल्याचं पाहायला मिळालं.

राजधानी मुंबईत काही वर्षांपूर्वी प्रभादेवी रेल्वे स्टेशनवर देखील अशाच अफेवतून मोठा अपघात झाला होता. रेल्वे स्थानकावरील पुलावरुन जात असताना कुणीतरी फूल पडलं असं म्हटलं, अन् पुल पडला... अशी अफवा पसरली. या अफवेनंतर स्थानकावर मोठी चेंगराचेंगरी झाली अन् तब्बल 23 प्रवाशांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली होती. केवळ अफवेतून 2017 मध्ये झालेल्या या दुर्घटनेची आठवण करुन देणारी जळगावची रेल्वे दुर्घटना आहे. कारण, इथेही एका अफवेनंच 8 ते 10 जणांचा बळी घेतल्याचं पाहायला मिळालं.

### अफवेनं केला घात, प्रत्यक्षदर्शींनी सांगितला थरार

जळगावहून मुंबईकडे एक्सप्रेस निघाली होती, पोचाराजवळी परधाडे स्थानकाजवळ ट्रेन आली असता ब्रेक दाबल्यानंतर घर्षण होऊन ठिणग्या उडतात, तशा ठिणग्या उडाल्या होत्या. मात्र, तेव्हा ट्रेनमधील एका प्रवाशाने आग लागली, आग लागली असं बोलल्यामुळे रेल्वेतील काही प्रवाशांनी चैन ओढल्यानंतर रेल्वे थांबली. त्याचवेळी, ट्रेनमधून काही प्रवाशांनी उड्या मारल्या. दुर्दैवाने त्याचवेळी दुसऱ्या बाजुने कर्नाटकडे जाणाऱ्या बंगळुरू एक्सप्रेसखाली चिरडून प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

अंदाजे 9 ते 10 लोकं रेल्वेखाली चिरडल्याचा अंदाज प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केला आहे. रेल्वेच्या एकाच डब्यातील लोकांनी ह्या उड्या मारल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितलंय. मात्र, कानावर पडलेल्या दोन शब्दांची कुठलीही खात्री न करता, संयम न बाळगता, घाईघाईने प्रवाशांनी रेल्वेतून उड्या मारल्या अन् नाहक जीव गमावला. त्यामुळे, एका अफवेनं घात केला अन् होत्याचं नव्हतं झालं.

दरम्यान, जळगावमधील आरपीएफ जवान, रेल्वे पोलीस आणि रेल्वेचे अधिकारी देखील घटनास्थळी पोहोचले आहेत. रेल्वे प्रशासनही घटनास्थळी पोहोचलं असून घटनेचा पंचनामा व मदतकार्य सुरू करण्यात आला आहे. येथील रेल्वे अपघात 6 ते 8 जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनास्थळी 8 रुग्णवाहिका देखील पोहोचल्या असून जिल्हा वैद्यकीय अधिकारी व रेल्वेचे अधिकारी मदतीसाठी प्रयत्नशील आहेत.

येथील तीन रुग्णालयांना आपण सक्रीय राहण्याचे सांगितले असून ग्रामीण व जिल्हा रुग्णालयात जखमींना मदत करण्यात येत आहे. प्रांताधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार 6 ते 8 जण रेल्वेखाली आल्याची माहिती आहे.




**जळगाव रेल्वे दुर्घटनेत १२ जणांचा मृत्यू**




जळगाव टीमचा मला फोन आला, मी लगेच तिकडे निघालो असून 10 ते 12 जण या अपघातात दगावल्याची माहिती आहे. ही घटना खूप दुर्दैवी असून घटनेसंदर्भातील माहिती प्रत्यक्षदर्शी गेल्यावरच मिळेल. अपघातातील जखमींना मदत व उपाचारासाठी सर्वतोपरी काम केले जाईल. पाचोऱ्यापासून 15 ते 20 मिनिटांच्या अंतरावर ही घटना घडली असून तेथील रुग्णालयात जखमींवर उपचार केले जातील, त्यासाठीची तयारी रुग्णालयाकडून करण्यात आली
- मंत्री गिरीश महाजन

---



जळगावचे नेत आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रसिध्दीमाध्यमांशी बोलताना घटनेची माहिती दिली. मी जिल्हाधिकारी यांच्यासोबत बोललो असून रेल्वे स्थानकावर ट्रेन उभी होती तेव्हा लोहमार्ग क्रॉस करताना ही दुर्दैवी घटना घडल्याचे समजते, मात्र हे निश्चित नाही - मंत्री गुलबराव पाटील

### मुख्यमंत्र्यांकडून शोक मदतीसाठी यंत्रणा सज्ज



जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. माझे सहकारी मंत्री गिरीश महाजन तसेच पोलीस अधीक्षक हे घटनास्थळी पोहोचले असून, जिल्हाधिकारी काही वेळात तेथे पोहोचत आहेत. संपूर्ण जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाशी समन्वयाने काम करीत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. 8 रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसेच नजीकच्या इतर खाजगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. ग्लासकटर, फ्लडलाईट्स इत्यादी आपातकालिन यंत्रणा सुद्धा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे, अशी महिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे

# एसटीचे 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान'



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर राज्यभरातील एसटीच्या सर्व बस स्थानकांवर 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान' राबवण्यात येणार आहे. तब्बल ३ कोटी रुपयांची बक्षिसे या अभियानांतर्गत देण्यात येणार असून राज्यात 'अ' वर्गात पहिल्या येणाऱ्या बस स्थानकाला १ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. शिवसेना पक्षनेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात येणार आहे.

एसटीच्या सर्व बस स्थानकांवर 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान राबविणार येणार असून या अभियानाचा शुभारंभ गुरुवारी कुर्ला नेहरूनगर बस स्थानकावर होणार आहे. यानिमित्ताने राज्यभर प्रत्येक बस स्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था व एसटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

सर्वसामान्य प्रवाशांना स्वच्छ व सुंदर बस स्थानक, तसेच निर्जंतुकीकरण, टापटीप प्रसाधनगृहे कायमस्वरूपी उपलब्ध करून देणे हे एसटी महामंडळाचे प्रथम कर्तव्य आहे. या जाणिवेतून हे अभियान सुरू करण्यात येत आहे. तसेच 'आपलं गाव, आपलं बस स्थानक' या संकल्पनेवर आधारित लोकसहभागातून बस स्थानकांचा सर्वांगीण विकास करणे हा या अभियानाचा मुख्य गाभा राहणार आहे. कोणतेही बस स्थानक हे त्या गावचे मध्यवर्ती ठिकाण असते. त्या अर्थाने बस स्थानक हे त्या गावची शान असल्यामुळे गावातील तरुण मंडळे, महिला बचत गट, विविध सामाजिक संस्था, उद्योग समूह यांनी पुढे येऊन त्या बस स्थानकाच्या सुशोभीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी मदत करावी, असे आवाहन यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

वर्षभर चालणाऱ्या या अभियानामध्ये दर ३ महिन्यांनी प्रत्येक बस स्थानकाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यासाठी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली परीक्षण समित्या नेमण्यात आल्या असून त्यांनी दिलेल्या गुणांच्या आधारे सरासरीद्वारे बस स्थानकाचे क्रमांक निश्चित करण्यात येतील. राज्यभरात एसटीच्या सर्व बस स्थानकांचे तेथील प्रवासी चढ-उतार संख्येच्या आधारे शहरी 'अ' वर्ग, निमशहरी 'ब' वर्ग व ग्रामीण 'क' वर्ग अशा तीन गटांमध्ये विभागणी केली आहे. प्रथम प्रादेशिक स्तरावर प्रत्येक गटनिहाय पहिला, दुसरा आणि तिसऱ्या क्रमांकासाठी स्पर्धा रंगणार असून अंतिम स्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक प्रादेशिक स्तरावर गटनिहाय पहिल्या आलेल्या बस स्थानकाचा विचार केला जाणार आहे. राज्यपातळीवर 'अ' वर्ग गटातून पहिला येणाऱ्या बस स्थानकाला १ कोटी रुपये, 'ब' वर्ग गटातून पहिला येणाऱ्या बस स्थानकाला ५० लाख रुपये, तर 'क' वर्ग गटातून पहिला येणाऱ्या बस स्थानकाला २५ लाख रुपये बक्षिस देण्यात येणार आहे.

# दावोसमध्ये इतिहास घडला!

## १५.७० लाख कोटींच्या गुंतवणुकीचे ५४ करार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**दावोस :** दि. 22 जानेवारीदावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये इतिहास घडला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात महाराष्ट्राने आजच्या दुसऱ्या दिवशीपर्यंत 15.70 लाख कोटी गुंतवणुकीच्या एकूण 54 सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या आहेत. यातून 15.95 लाख रोजगारनिर्मिती होईल.आजच्या सामंजस्य करारांपैकी सर्वांत मोठ्या गुंतवणुकीचा करार हा रिलायन्स समूहाचा असून, पेट्रोकेमिकल्स, पॉलिस्टर, नवीनीकरणीय ऊर्जा, बायोएनर्जी, हरित हायड्रोजन, ग्रीन केमिकल्स, औद्योगिक क्षेत्रविकास, रिटेल, डेटा सेंटर्स, टेलिकम्युनिकेशन्स, आदरातिथ्य आणि रिअर इस्टेट या क्षेत्रात ते 3,05,000 कोटी इतकी गुंतवणूक करणार आहेत. या एका करारातून 3 लाख रोजगारनिर्मितीचा अंदाज आहे. रिलायन्स समूहासोबत 3 लाख 5 हजार कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला असून यातील बहुसंख्य गुंतवणूक ही सेवा क्षेत्रात होणार असल्याने सुमारे 3 लाख रोजगार निर्मिती यातून होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात नवभारताच्या निर्मितीत योगदान देणारा हा करार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्र 1 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे पहिले राज्य बनवावे, हे स्वप्न आहे. त्यादृष्टीने आम्ही ही गुंतवणूक करणार आहोत, असे रिलायन्स समूहाचे अनंत अंबानी यांनी यावेळी सांगितले.दुसरी मोठी गुंतवणूक ही ॲमेझॉन करणार असून, ती 71,795 कोटी रुपये इतकी आहे. एमएमआर क्षेत्रात डेटा सेंटर्सच्या माध्यमातून या गुंतवणुकीतून 83,100 इतके रोजगार निर्माण होणार आहेत. गेल्या 2 दिवसांत जे सामंजस्य करार झाले, त्यातून राज्याच्या सर्व भागात गुंतवणूक होत असून, समतोल विकासाचा उद्देश यातून साध्य होणार आहे. या एकूण करारांपैकी उद्योग विभागाने 11.71 कोटींचे करार केले असून, एमएमआरडीएने 3.44 लाख कोटी तर सिडकोने 55,200 कोटींचे करार केले आहेत.

### टोनी ब्लेअर यांची भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांची भेट घेतली. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान ही भेट झाली. या दोघांमध्ये ऊर्जा आणि सार्वजनिक वाहतूक क्षेत्रासंदर्भात चर्चा झाली. टोनी ब्लेअर यांनी लवकरच भारतात येणार असल्याचा मनोदय यावेळी व्यक्त केला. याशिवाय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्युंडई मोटर्सचे कार्यकारी उपाध्यक्ष बम किम यांची भेट घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीपी वर्ल्डचे अध्यक्ष सुलतान अहमद बिन सुलाएम आणि त्यांचे भारताचे प्रबंध संचालक, सीईओ रिझवान सोमर यांचीही भेट घेतली. महाराष्ट्रात इंडस्ट्रीयल पार्क, लॉजिस्टीक इत्यादी क्षेत्रात सहकार्याबाबत यावेळी चर्चा झाली.



**रेल्वेच्या कारवाई विरोधात कल्याण न्यायालयात अर्ज दाखल**

मची शाळा ५८ वर्षापासून वालधुनी येथील जागेवर आहे. रेल्वेने अचानक आम्हाला दोन कोटी ४४ लाख रूपयांचे भाडे भरा असे फर्मावले आहे. हा आदेश पाळणार नसाल तर तात्काळ शाळा रिकामी करा, असे सुचवले आहे. एवढी रक्कम शाळेला भरणे शक्य नाही. दहावी, शाळा अंतर्गत परीक्षा आता सुरू होणार आहेत. अशावेळी आम्ही अचानक विद्यार्थी, शाळा साहित्य घेऊन कोठे जायचे? रेल्वेच्या कारवाई विरोधात आम्ही कल्याण न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. रेल्वेने आम्हाला मुदत द्यावी. रेल्वेच्या कारवाईला स्थगिती द्यावी. रेल्वेने रेटून कारवाई केली तर विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात जाईल, अशी भीती अर्जात व्यक्त करण्यात आली आहे, असे शाळा चालकांनी सांगितले.

# रेल्वेचा शाळेला अल्टिमेटम !


## चारशे विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता :**

कल्याण – कल्याणमधील वालधुनी येथे रेल्वेच्या जागेवर मागील अनेक वर्षापासून एक इमारतीत एका संस्थेकडून शाळा चालविली जाते. ही शाळा रेल्वेच्या जागेत असल्याने रेल्वे प्रशासनाने शाळेला २८ जानेवारीपर्यंत शाळा रिकामी करण्याची नोटीस दिली आहे. या नोटिसीमुळे शाळा चालक, पालक, विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. सुमारे ४०० विद्यार्थी या शाळेत शिकतात. आता परीक्षांचा हंगाम आला आहे आणि याच कालावधीत शाळेवर कारवाई होणार असल्याने शाळा चालक, शिक्षक, विद्यार्थी, पालकांमध्ये घबराट पसरली आहे. अचानकच्या रेल्वेच्या या कारवाईला शाळा चालक, विद्यार्थी, पालकांनी विरोध केला आहे. वालधुनी येथील रेल्वे रुग्णालयाच्या बाजुला असलेल्या जागेत ५८ वर्षापासून एका संस्थेकडून एक इंग्रजी शाळा चालविली जाते. या शाळेत सुमारे ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मंगळवारी रेल्वेचे अधिकारी शाळा रेल्वेच्या जागेवर असल्याने कारवाईसाठी आले होते. शाळा चालक, पालक, विद्यार्थ्यांनी विरोध केल्याने रेल्वेचे अधिकारी परतले. त्यांनी २८ जानेवारीपर्यंत शाळा रिकामी करण्याची नोटीस शाळा चालकांना दिली आहे. रेल्वे प्रशासनाने कल्याण, शहाड, विठ्ठलवाडी, आंबिवली भागातील रेल्वे स्थानका लगत, रेल्वेच्या जागेवर असलेल्या बेकायदा बांधकामांवर कारवाई सुरू केली आहे. त्याप्रमाणे त्यांनी या शाळेवर कारवाईचा बडगा उगारला आहे. शाळा चालकांनी माध्यमांना सांगितले दरम्यान माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी शाळा चालकांची भेट घेतली. आपण शाळेच्या पाठीशी असल्याचे सांगितले. आपण विकासाच्या विरोधी नाही. पण रेल्वेने कारवाई करण्यापूर्वी शाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. अचानक ४०० विद्यार्थी, तेथील साहित्य घेऊन शाळा चालक जातील कोठे. नवीन इमारत शाळेला तात्काळ कोणी देणार नाही. त्यामुळे रेल्वेच्या कारवाईला आपण विरोध करत आहोत. शासनाने याप्रकरणात लक्ष घालावे, अशी मागणी त्यांनी केली.

# हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे



मुंबई शहरावर 4 दशके राज्य करणारे बाळासाहेब ठाकरे आजही लोकांच्या हृदयात जिवंत आहेत. लोक त्यांना हिंदुहृदयसम्राट म्हणत. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव बाळ केशव ठाकरे होते पण ते बाळासाहेब ठाकरे म्हणून लोकप्रिय होते. आज बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्ताने चला जाणून घेऊया त्यांच्याबद्दलचे काही रंजक किस्से, ज्याबद्दल आजही अनेकांना माहिती नाही.

1. बाळासाहेब ठाकरे यांनी एका दैनिकात व्यंगचित्रकार म्हणून आपली कारकीर्द सुरू केली. पण कामात मजा न आल्याने त्यांनी नोकरी सोडली. त्यानंतर त्यांनी मार्मिक हे राजकीय साप्ताहिक सुरू केले. ज्याचा उद्देश अमराठी लोकांच्या वाढत्या प्रभावाविरुद्ध प्रचार करणे हा होता. 1966 मध्ये या मोहिमेत यश मिळाल्यानंतर बाळासाहेबांना शिवसेना पक्ष स्थापन करण्याची कल्पना सुचली.

2. बाळासाहेब ठाकरे यांना चांदीच्या सिंहासनावर बसण्याची आवड होती.

3. बाळा साहेब ठाकरे यांची राजकारणावर चांगली पकड होती. यासोबतच ते उत्तम प्रवक्तेही होते. ते नेहमी न बघता भाषणे देत. त्याला ऐकण्यासाठी हजारो लोकांची गर्दी व्हायची.

4. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची अनोख्या शैलीत स्थापना केली होती. 19 जून 1966 रोजी शिवाजी पार्कमध्ये नारळ फोडून त्यांनी शिवसेना पक्षाची स्थापना केली.

5. बाळासाहेब ठाकरे यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते कधीही कोणाला भेटायला गेले नाहीत. त्यांना भेटण्यासाठी मोठमोठी व्यक्ती त्यांच्या निवासस्थानी मातोश्रीवर पोहोचत असत.

6. बाळासाहेब ठाकरे हे देशातील सर्वात जास्त चर्चेत असलेल्या व्यक्तीमत्वांपैकी एक होते. त्यांचे छंदही चर्चेचा विषय होते. होय त्यांना रेड वाईन आणि सिगार खूप आवडत होते. त्यांचे अनेक फोटो आहेत ज्यात ते हातात सिगार धरलेला दिसतात. शेवटच्या श्वासापर्यंत ते सिगार ओढत राहिले.

7. महाराष्ट्रात सरकार स्थापन करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली पण त्यांनी कधीही निवडणूक लढवली नाही.

8. बाळा साहेबांना भारतातील सर्वात प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे खूप प्रेम होते. पण एकदा सचिन म्हणाला होता, 'महाराष्ट्रावर संपूर्ण भारताचा हक्क आहे.' सचिनच्या या वक्तव्यावर बाळासाहेब ठाकरे चांगलेच नाराज झाले होते. आणि ते म्हणाले होते की 'त्याने क्रिकेट खेळावे, राजकारण आम्हाला खेळू द्यावे.'

9. बाळासाहेब ठाकरे हे स्पष्टवक्ते होते. त्यांना कधीही कोणाची भीती वाटली नाही. राजकारणातील सोनिया गांधींवर टीका करताना बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते. त्यांनी या देशावर राज्य करण्यापेक्षा पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात दिले तर बरे होईल. सत्तेचा अधिक अनुभव असलेल्या लोकांच्या हाती देश सोपवण्यास मी प्राधान्य देईन.

10. 17 नोव्हेंबर 2012 मध्ये बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले तेव्हा संपूर्ण मुंबईत शांतता पसरली. त्या दिवशी संपूर्ण मुंबई बंद होती. त्यांच्या अखेरच्या यात्रेत सुमारे 5 लाख लोक सहभागी झाले होते. 21 तोफांची सलामी देणारे ते पहिलेच व्यक्ती होते.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आज जयंती आहे. या निमित्ताने विधान भवनात त्यांच्या तैलचित्राचं आज अनावरण करण्यात येणार आहे. बाळासाहेब ठाकरे यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील भगवे वादळ आणि मराठी माणसाच्या हितासाठी लढणारा लढवय्या नेता अशी ख्याती होती. बाळासाहेबांनी राजकीय व कौटुंबिक जीवनात अनेक चढउतार अनुभवले. व्यंगचित्रकार म्हणून कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या बाळासाहेबांनी मराठी माणसांच्या न्याय्यहक्कांसाठी शिवसेना ही संघटना उभारली आणि वाढवली. या संघटनेनं लाखो मराठीजनांना एक आवाज दिला.

बाळासाहेब ठाकरे यांचा राजकीय प्रवास अनेक चढ उतरांचा होता. त्यांनी मराठी माणसांचे प्रश्न प्रामुख्याने मांडले. त्यांच्या जन्म २३ जानेवारी १९२६ जी मुंबईतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील केशव सिताराम ठाकरे म्हणजे प्रबोधनकार ठाकरे हे समाजसुधारक होते. राजर्षी शाहू महारांजांच्या सोबत त्यांनी समाजसुधारणेचे काम केले होते.

बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांचा कारकिर्दीची सुरवात १९५५ साली एक व्यंगचित्रकार म्हणून केली. इंग्रजी वृत्तपत्र द फ्री प्रेस जर्नलमध्ये ते कार्टून रंगवायचे. १९६० साली बाळासाहेब आणि त्यांचे बंधू श्रीकांत ठाकरे यांनी मार्मिक हे राजकीय व्यंगचित्रण करणारे मासिक सुरू केले. त्यामाध्यमातून त्यांनी मराठी माणसाचे प्रश्न प्रामुख्याने मांडले.

१९ जून १९६६ साली प्रबोधनकार ठाकरे यांच्या आशीर्वादाने बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना या मराठी भाषकांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या राजकीय पक्षाची स्थापना केली. मुंबईतील मराठी माणसाच्या हक्कासाठी लढणारी संघटना अशी या पक्षाची ओळख ठरली. भाजपसोबत शिवसेनेते १९८४ साली युती केली. त्याच्या पुढच्याच वर्षी शिवसेनेने भाजपच्या मदतीने मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकली.

१९८९ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी सामना या वृत्तपत्राची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी मराठी माणसाच्या हिताच्या आणि अधिकाराच्या गोष्टी मांडल्या. बाळासाहेब ठाकरे यांनी १९९२ मध्ये झालेल्या बाबरी मशिदीच्या झालेल्या पाडावाचं समर्थन त्यांनी केलं. बाबरीच्या पतनानंतर मुंबईत बाँबस्फोट झाले आणि त्यानंतर धार्मिक दंगली उसळल्या. या दंगलीमध्ये शिवसैनिकांचा समावेश होता असा अहवाल श्रीकृष्ण समितीने दिला. ऐंशीच्या दशकात बाळासाहेबांनी हिंदुत्वाची भूमिका घेतली आणि आपल्या पक्षाचा विस्तार वाढवण्याच्या दृष्टीने पाऊलं उचलली. सुरुवातीच्या काळात दक्षिण भारतीयांच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या शिवसेनेने नंतरच्या काळात उत्तर भारतीयांच्या विरोधात भूमिका घेतली.

१९८९ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी सामना या वृत्तपत्राची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी मराठी माणसाच्या हिताच्या आणि अधिकाराच्या गोष्टी मांडल्या. बाळासाहेब ठाकरे यांनी १९९२ मध्ये झालेल्या बाबरी मशिदीच्या झालेल्या पाडावाचं समर्थन त्यांनी केलं. बाबरीच्या पतनानंतर मुंबईत बाँबस्फोट झाले आणि त्यानंतर धार्मिक दंगली उसळल्या. या दंगलीमध्ये शिवसैनिकांचा समावेश होता असा अहवाल श्रीकृष्ण समितीने दिला. ऐंशीच्या दशकात बाळासाहेबांनी हिंदुत्वाची भूमिका घेतली आणि आपल्या पक्षाचा विस्तार वाढवण्याच्या दृष्टीने पाऊलं उचलली. सुरुवातीच्या काळात दक्षिण भारतीयांच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या शिवसेनेने नंतरच्या काळात उत्तर भारतीयांच्या विरोधात भूमिका घेतली.

बाळासाहेब ठाकरे यांचा जीवांप्रवास हा संघर्षमय राहिला. त्यांनी त्यांच्या जीवनात अनेक चढ उतार अनुभवले. १९९५ साली शिवसेना भाजप युतीने महाराष्ट्रातील सत्ता काबिज केली. शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्रीपदी बसले. २००४ साली उद्धव ठाकरे यांची शिवसेनेच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर २००६ साली राज ठाकरे यांनी शिवसेना सोडण्याचा निर्णय घेतला. ९ मार्च २००६ साली त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाची स्थापना केली.

बाळासाहेब ठाकरे यांच्यावर २००९मध्ये अँजिओप्लास्टी करण्यात आली. मे २०१२ मध्ये त्यांना मुंबईतील लिलावती रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. १५ नोव्हेंबर रोजी बाळासाहेबांना श्वास घेण्यात अडचण येऊ लागली. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी दुपारी बाळासाहेब ठाकरे यांचं निधन झालं. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने अवघा महाराष्ट्र हळहळला.

## गीतासार



अध्याय २ साङ्ख्ययोगः
ॐ श्रीपरमात्मने नमः
अथ द्वितीयोऽध्यायः

सञ्जय उवाच :तं तथा
कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच
मधुसूदनः ॥२- १॥

अर्थ

संजय म्हणाले, अशा रीतीने करुणेने व्याप्त, ज्याचे डोळे आसवांनी भरलेले व व्याकूळ दिसत आहेत, अशा शोक करणाऱ्या अर्जुनाला भगवान मधुसूदन असे म्हणाले. ॥ २-१ ॥

श्रीभगवानुवाच
कुतस्त्वा कश्मलमिदं
विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन
॥२- २॥

अर्थ

श्रीभगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे अर्जुना, या भलत्याच वेळी हा मोह तुला कशामुळे उत्पन्न झाला? कारण हा थोरांनी न आचरलेला, स्वर्ग मिळवून न देणारा आणि कीर्तिकारकही नाही. ॥ २-२ ॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ
नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ
परन्तप ॥२- ३॥

अर्थ

म्हणून हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), षंढपणा पत्करू नकोस. हा तुला शोभत नाही. हे परंतपा, अंतःकरणाचा तुच्छ दुबळेपणा सोडून देऊन युद्धाला उभा राहा. ॥ २-३ ॥

## मार्मिक सामना

बाळासाहेबांची शैली
जगात धन्य लौकिक
मराठी मातीस लाभे
असा अमुल्यमौक्तीक

हिंदू हृदय सम्राट हा
जग जाणे लौकिक
अयोध्या मंदीर झाले
तुष्ट कारसेवा श्रमिक

मराठी माणसा प्रती
असे विशेषजवळीक
बॉम्बेची केली मुंबई
स्वभावात आगळीक

व्यंगचित्र साप्ताहिक
सर्वत्र गाजले मार्मिक
व्यंग ना ज्याच्या मनी
विचार ते अलौकिक

पक्षाचे मुख पत्र सार्थ
चालवे सामना दैनिक
रक्षण करी समाजाचे
शब्द शस्त्रांचे सैनिक

हिंदूहृदय सम्राट सार्थ
असा न दुजा धार्मिक
अयोध्या मंदिराकरता
कार सेवक कार्मिक

वक्तृत्व प्रभाव लाघवी
जुडले अनेकनागरिक
पक्ष विस्तार विस्तृत
केली अतूट सोयरिक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## किचन टिप्स

## या भाज्यांमध्ये चुकूनही टोमॅटो घालू नका




**कारल्याची भाजी-**
अनेक प्रकारच्या पोषक तत्वांनी समृद्ध असलेल्या कारल्यात टोमॅटो घालू नये. जर त्यात टोमॅटो घातले तर कारले शिजणार नाही. भाजी चिकट होईल. जिला चव येणार नाही. याकरिता चुकूनही कारल्याच्या भाजीत टोमॅटो घालू नये.

**हिरव्या पालेभाज्या-**
हिवाळा आणि उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असलेल्या पालक, मेथी इत्यादी सारख्या पालेभाज्यांमध्ये टोमॅटो घालू नये. या भाज्यांमध्ये टोमॅटो घातल्याने भाजीची चव खराब होऊ शकते. हिरव्या पालेभाज्या शिजवताना भरपूर पाणी सोडतात. अशा परिस्थितीत ते ओले राहते. त्यात टोमॅटो घातला तर ते अधिक ओले होईल जे खाताना चवीला चांगले लागणार नाही.

**भेंडीची भाजी-**
टोमॅटोचा वापर भेंडीच्या भाजीतही करू नये. भेंडी स्वतःच चिकट असते. जर त्यात टोमॅटो घातला तर ते आणखी चिकट होते. टोमॅटोचा आंबटपणा आणि भेंडीची चव यांचे परिपूर्ण मिश्रण होत नाही. भेंडीच्या भाजीत टोमॅटो घातल्याने चांगली चव येत नाही.

## एलिगंट साडी कॉर्पोरेट लुकसाठी उत्तम



जेव्हा जेव्हा एखादा कॉर्पोरेट कार्यक्रम असतो तेव्हा त्याची योग्य तयारी करणे अत्यंत महत्वाचे असते. बऱ्याचदा कॉर्पोरेट कार्यक्रमांसाठी आपल्याला व्यावसायिक लूक हवा असतो आणि म्हणूनच पँट- ब्लेझरने स्टाईल करायचे असते. पण कॉर्पोरेट कार्यक्रमांमध्ये साडीसारखे एथनिक पोशाख घालणे देखील चांगली कल्पना असू शकते. हे तुम्हाला अधिक सुंदर बनवतेच, शिवाय तुम्हाला व्यावसायिक देखील बनवते. तथापि साडीमध्ये तुमचा आकर्षक व्यावसायिक लूक संतुलित करणे कधीकधी कठीण काम असू शकते.

कोणत्याही कॉर्पोरेट कार्यक्रमासाठी योग्य साडी निवडणे अत्यंत महत्वाचे आहे. बऱ्याचदा आपली स्टाईल वाढवण्यासाठी आपण काही छोट्या चुका करतो ज्यामुळे साडीतील तुमचा लूक व्यावसायिक दिसत नाही. कॉर्पोरेट कार्यक्रमासाठी साडीच्या कापडापासून ते तिच्या रंगापर्यंत, अनेक लहान गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागते. तर आज या लेखात आम्ही तुम्हाला कॉर्पोरेट कार्यक्रमांसाठी साडी खरेदी करताना किंवा निवडताना कोणत्या गोष्टी लक्षता ठेवायच्या आहते ते सांगत आहोत-

फॅब्रिक- कॉर्पोरेट कार्यक्रमासाठी साडी निवडताना कापडाकडे दुर्लक्ष करणे ही एक मोठी चूक ठरू शकते. खरं तर कॉर्पोरेट कार्यक्रम तासन्तास चालू शकतात आणि अशात ब्रोकेड, कडक सिल्क किंवा स्क्रॅची नेट फॅब्रिक निवडणे तुमच्यासाठी त्रासदायक ठरू शकते. म्हणून, शिफॉन, जॉर्जेट, क्रेप किंवा कॉटन सिल्क, लिनेन सारख्या हलक्या कापडापासून बनवलेली साडी निवडण्याचा प्रयत्न करा. ते फक्त चांगले नेसायला सोपे नसून हाताळायलाही खूप सोपे जाते. यामुळे तुम्हाला जडपणा जाणवत नाही.

हँडलूम किंवा लाइटवर्क - कॉर्पोरेट कार्यक्रमांमध्ये स्टायलिश दिसण्यासाठी जर खूप भरतकाम केलेल्या साड्या निवडत असाल तर सावध व्हा. हे करणं टाळलं पाहिजे. जेव्हा तुम्ही जड भरतकाम असलेली किंवा त्यावर आधारित चमकदार क्रम असलेली साडी निवडता तेव्हा ती तुम्हाला व्यावसायिक लूक देत नाही. उलट असं वाटतंय की तुम्ही एखाद्या लग्नात किंवा समारंभात सहभागी होणार आहात. तथापि याचा अर्थ असा नाही की तुम्ही कॉर्पोरेट कार्यक्रमासाठी पूर्णपणे साधी साडी निवडावी. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही लहान मोटिफ, कमी भरतकाम किंवा हलके जरी बॉर्डर यासारख्या काही डिझाइन निवडू शकता. शिवाय हँडलूम किंवा लाइटवर्क साड्याची निवड देखील योग्य ठरेल.

रंगाचा खेळ- जेव्हा तुम्ही कॉर्पोरेट कार्यक्रमासाठी साडी खरेदी करत असाल तेव्हा तुम्ही रंगाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आपण बऱ्याचदा याकडे दुर्लक्ष करतो. कॉर्पोरेट कार्यक्रमांसाठी खूप गडद रंग चांगले दिसत नाहीत. त्याच वेळी यामुळे तुमचा लूक व्यावसायिक दिसत नाही. कधीही चमकदार लाल, निऑन किंवा खूप मॅटलिक रंगात साडी खरेदी करू नका. त्याऐवजी तुम्ही पेस्टल, पीच, नेव्ही ब्लू, ग्रे किंवा मरून इत्यादी रंग निवडू शकता.

कार्यक्रमाची थीम किंवा ड्रेस कोड- कॉर्पोरेट कार्यक्रमासाठी साडी निवडताना, कार्यक्रमाच्या थीम किंवा ड्रेस कोडकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. जर तुम्ही त्याकडे दुर्लक्ष केले तर तुमचा लूक पूर्णपणे वेगळा दिसेल, जो अजिबात योग्य नाही. म्हणून कार्यक्रमाचे वातावरण, थीम किंवा ड्रेस कोड लक्षात घेऊन नेहमीच साडी निवडा. फॉर्मल मीटिंगसाठी स्ट्रक्चर्ड फॅब्रिक आणि कमीत कमी डिझाइन निवडा. जर ते सेमी-फॉर्मल असेल तर तुम्ही ट्रेंडी किंवा फ्यूजन साड्यांसह प्रयोग करू शकता.

तेथे कर माझे जुळती

# सुभाषचंद्र बोस जयंती

## ( २३ जानेवारी १८९७ - १९४५)



भारतीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा उभारणारे , सर्वस्व पणाला लावणारे महानायक म्हणून मातृभूमीच्या मुक्तीसाठी अविरत प्रयत्न करणारे नेताजी सुभाष चंद्र बोस भारतीय इतिहासात कसेअमर राहिले चिरस्मरणीय ठरले , हे त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने पाहू या .

सुभाष चंद्र बोस यांचा जन्म 23 जानेवारी 1897 रोजी ओरिसातील कटक येथे झाला . जानकीनाथ बोस आणि प्रभावती देवी हे त्यांचे माता पिता .ते जात्याच कुशाग्र बुद्धिमत्तेचे व आक्रमक स्वभावाचे होते . त्यांचे वडील कटक मध्ये सरकारी वकील होते . 1902 मध्ये सुभाष चंद्र कटक मधील मिशनरी शाळेत दाखल झाले . 1909 मध्ये त्यांनी रेवेंशा स्कूल कटक येथे शिक्षण घेतले. मार्च 1913 मध्ये मॅट्रिक्युलेशन ची परीक्षा ते कलकत्ता विद्यापीठात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले .1915 मध्ये इंटरमिजिएट परीक्षेत विशेष श्रेणीत ते उत्तीर्ण झाले . पुढे 1919 मध्ये स्कॉटिश चर्च कॉलेजमधून पहिल्या श्रेणीत त्यांनी पदवी प्राप्त केली .

असामान्य धैर्य , संघटनचातुर्य , अमोघ वक्तृत्व अशा अनेक गुणांचे वरदान लाभलेल्या सुभाषचंद्र बोस यांनी लंडन येथे जाऊन अत्यंत कठीण समजला जाणारा आय .सी .एस . ( इंडियन सिव्हील सर्व्हिस ) अभ्यासक्रम पूर्ण केला . भारतातील अस्वस्थ राजकीय स्थिती 'स्वातंत्र्यसंग्रामाचे बदलते टप्पे यामुळे त्यांनी पुन्हा मायदेशी धाव घेतली . त्यांचे राजकीय गुरु चिंतरंजन दास यांच्या प्रेरणेने ते राजकारणात पडले .नंतर बंगाल काँग्रेसमध्ये त्यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. काँग्रेसमध्ये सुभाष चंद्र बोस यांनी अनेक पदे भूषवली . ' सविनय कायदेभंगा 'च्या आंदोलनानंतर झालेल्या गांधी आयर्विन करारामुळे प्रत्यक्ष हाती काहीच लागलं नाही . तसंच भगतसिंगला फाशीपासूनही वाचवता आले नाही .त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध लढण्यासाठी निःशस्त्र प्रतिका रापेक्षा सशस्त्र लढायची गरज आहे ,असं त्यांचं मत बनलं . पुढे त्यांचे आणि महात्मा गांधींचे मतभेद झाल्यामुळे सुभाष बाबूंना काँग्रेस सोडावी लागली .त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' हा पक्ष स्थापन केला .

सशस्त्र क्रांतिकारकांशी संबंध असल्याच्याआरोपावरून इ .स .1932 मध्ये ब्रिटिशांनी सुभाष बाबूंना हद्दपार केले . त्यानंतर 1936 पर्यंत त्यांनी व्हिएन्नामध्ये राहून युरोपच्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. पुढे भारतात परतल्यानंतर सुभाष बाबूंनी घेतलेल्या जहाल भूमिकेमुळे व त्यांना मिळणाऱ्या पाठिंब्यामुळे ब्रिटिश सत्ता हादरली .1940 मध्ये राष्ट्रीय आंदोलनाला आरंभ करण्याआधीच त्यांना स्थानबद्ध करण्यात आले . राहत्या घरात नजर कैदेत असलेले सुभाष चंद्र बोस वेषांतर करून भूमिगत झाले आणि पेशावर मार्गे काबुल येथे गेले . भारतीय स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांच्या शत्रू राष्ट्रांची मदत मिळवण्यासाठी त्यांनी जर्मनी , इटली आणि जपान येथे भेटी दिल्या . फेब्रुवारी 1942 मध्ये त्यांनी जर्मनीत श्रीमती इमिली झेंकल यांच्याशी विवाह केला . ते हिटलर व मुसोलिनी यांनाही भेटले . तिथल्या वास्तव्यात त्यांनी हिंदी लोकांना ब्रिटिशांच्या विरोधात लढ्याला प्रवृत्त केले . 1943लाजपानमध्ये आल्यानंतर त्यांनी सिंगापूर येथे 'आझाद हिंद ' या प्रति सरकारची स्थापना केली . सुभाष चंद्र बोस स्वतः त्याचे राष्ट्रप्रमुख , पंतप्रधान ,संरक्षण मंत्री व सरसेनापती झाले . या शासनाला जपान , जर्मनी , इटली, ब्रह्मदेश अशा अकरा देशांची मान्यता मिळाली . या प्रति सरकारने स्वतःची तिकिटे व नोटाही काढल्या होत्या . यातूनच'आझाद हिंद सेना 'उभी राहिली . 'तुम मुझे खून दो ,मै तुम्हे आझादी दूंगा ' या त्यांच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला .विशेष म्हणजे कॅप्टन लक्ष्मी सहगल यांच्या नेतृत्वाखाली महिलांची पलटणही तेथेकार्यरत होती . एकीकडे दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश गुंतले होते .त्याच वेळी आझाद हिंद सेनेने भारतीय स्वातंत्र्यासाठी ' चलो दिल्ली 'चा नारा दिला .सेनेची आगे कूच सुरू झाली .वायव्य सरहद्द प्रांतातून भारतात प्रवेश घेण्याची नेताजी यांची योजना होती . जपानने जिंकलेली अंदमान व निकोबार ही बेटे आझाद हिंद सेनेला मिळाली .त्यांना अनुक्रमे 'शहीद 'व 'स्वराज्य ' अशी नावे सुभाषचंद्र बोस यांनी दिली. इम्फाळ येथे त्यांची व बलाढ्य ब्रिटिशांची जोरदार लढाई झाली . आझाद हिंद सेना प्रतिकूल परिस्थितीतही प्राणपणाने लढत होती .नेताजींना पराभव दिसत असतानाही त्यांनी सेनेच मनोधैर्य कायम राखलं .

अखेर नैसर्गिक आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली . याच काळात महायुद्धामध्ये जर्मनी जपान व इटलीचा पराभव झाला . म्हणून सेनेचा मोठा आधार गेला पुढे .14 ऑगस्ट 1945 रोजी जापान शरण गेले . 17 ऑगस्ट 1945 रोजी विमानाने सहकार्य मिळवण्यासाठी रशियाकडे नेताजी जात होते . दुर्दैवाने त्यांच्या विमानाला अपघात झाला . 18 ऑगस्ट 1945 रोजी सुभाष बाबू बेपत्ता झाले .त्यांच्या मृत्यूचे गूढ अजूनही कायम आहे .अशाप्रकारे भारताच्या स्वातंत्र्यसमराचे अंतिम सेनानींचा , लोकोत्तर बलशाली नेतृत्वाचा व " इंडियन स्ट्रगल "या उत्कृष्ट पुस्तकाच्या लेखकाचा शेवट झाला .भारत मातेच्या या महान नेत्यास शतशः प्रणाम ! जयहिंद ।



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' जिल्हा परिषदेत कार्यक्रम सपंन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :
बेटी बचाओ, बेटी पढाओ' या उपक्रमामुळे लिंगभेद चाचणी पध्दतींना प्रतिबंध करण्यासाठी तसेच, मुलींचे संरक्षण आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण योगदान मिळाले आहे. या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' (BBBP) या उपक्रमाला दि. २२ जानेवारी, २०२५ रोजी दहा वर्ष पूर्ण होत असल्याने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आज विषेश कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या उपक्रमाला दहा वर्ष पुर्ण होत असून स्त्रियांचा सन्मान करणे महत्त्वाचे आहे. मुलींच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक समानतेसाठी सर्वांनी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

यावेळी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, महिला व बाल विकास विभाग प्रमुख संजय बागुल, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, लघुपाट बंधारे विभाग प्रमुख दिलीप जोकार, सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

"मी प्रतिज्ञा करते / करतो की, मी मुलगी आणि मुलगा यांना समान मानेल व स्त्रीभ्रूण हत्येचा आणि असे कृत्य करण्याऱ्यांचा विरोध करेन. मी मुलीच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक समानतेसाठी सदैव कटीबध्द राहीन. 'बेटी बचाओ बेटी पढ़ाओं' या राष्ट्रीय अभियानात सहभागी होवून अभियानाच्या यशस्वीतेसाठी सदैव प्रयत्नशील राहीन." ही सामुहिक शपत यावेळी घेण्यात आली.

# ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात 'रस्ता सुरक्षा अभियाना'चा जागर

'व्हिजन १०० डेज'

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :
- प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे येथे आज राज्य रस्ता सुरक्षा अभियान 2025 व शासनाच्या 100 दिवसाचा प्राधान्यक्रम या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन विभागामार्फत घेण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला संबोधताना श्रीमती हेमांगिनी पाटिल, प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांनी गेल्या साधारणतः सहा महिन्यांमध्ये प्रादेशिक परिवहन विभागामार्फत केलेल्या उपाययोजना, जनजागृती कार्यक्रम, वायुवेग पथकांची कामगिरी याबाबत माहिती दिली.

यामध्ये सुमारे 1 हजार 500 चालकांची नेत्रतपासणी, 2 हजार स्कूल बस चालक व सहवर्ती यांचे शिबीर, ब्लॅक स्पॉट सर्व्हे तसेच त्यातील सुधारणा उपाययोजना, हेल्मेट वापराबाबत नागरीकांमध्ये जनजागृती, सायकल रॅली, दुचाकी रॅली, महिला कार रॅली, रक्तदान शिबीर, मोटार ड्रायव्हिंग स्कूल यांचे शिबीर, 10 हजार विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा, शाळा-महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षतेबाबत व्याख्याने इत्यादी बाबींचा समावेश होता.तसेच प्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या माध्यमातून लेखक विजय कट्टी यांचे "आजीची-रस्ता सुरक्षा बाबतची गोष्ट" नावाचे लहान मुलांचे पुस्तक प्रकाशित करयात आले.
यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती हेमांगिनी पाटील, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी मानसिंग खाडे, धनंजय गोसावी, गणेश पाटील, लेखक विजय कट्टी, सुप्रसिद्ध अभिनेते जयराज नायर व प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने ग्रंथ चर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :

मराठी भाषा विभागाच्यावतीने 14 जानेवारी ते 28 जानेवारी हा 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने प्रकाशित झालेल्या महाराष्ट्राचे शिल्पकार विष्णू नारायण भातखंडे या पुस्तकावर 'ग्रंथचर्चा व भातखंडे संगीत परंपरा सादरीकरण' हा कार्यक्रम गुरुवार, दिनांक 23 जानेवारी, 2025 रोजी सकाळी 11 वाजता रवींद्र नाट्यमंदिर, न्यू मिनी थिएटर, 5 वा मजला येथे आयोजित करण्यात आला आहे.
या कार्यक्रमात ज्येष्ठ लेखक रामदास भटकळ, सारंगी आंबेकर, निसर्ग देहूक्कर, ज्ञानेश्वर सोनावणे व जयंत नायडू यांचा सहभाग असणार आहे. तसेच 'अभिजात मराठी अभिमान मराठी' लेखक, गायक डॉ.आशुतोष जावडेकर यांचा भावसंवाद कविता, गाणी, अभिवाचन आणि मनसोक्त गप्पा... हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक 24 जानेवारी रोजी सायंकाळी 05.30 वाजता आयोजित करण्यात आला आहे.
हा कार्यक्रम डॉ.आशुतोष जावडेकर सादर करणार आहेत. मंडळाने आयोजित केलेले वरील दोन्ही कार्यक्रम सर्वांकरिता मोफत खुले असून सर्वांनी सदर कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ.मीनाक्षी पाटील यांनी केले आहे.

# डॉ.पी.पी. वावा यांनी केले केडीएमसीच्या कारभाराचे कौतुक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :
सफाई कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत, समस्यांबाबत राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी. वावा, सल्लागार गिरीधर नाथ, समन्वय संदिप चरण यांनी महापालिका मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात महापालिका अधिका-यांची भेट घेतली आणि सफाई कर्मचा-यांच्या प्रश्नांबाबत महापालिकेने दिलेल्या माहितीबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी महापालिकेचे अति.आयुक्त हर्षल गायकवाड, अति.आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त वंदना गुळवे, अतुल पाटील, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव व इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग तसेच विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांनी महानगरपालिका सफाई कर्मचा-यांना देत असलेल्या सोय-सुविधांबाबत आणि इतर प्रश्नांबाबत पीपीटी व्दारा सादरीकरण करुन सविस्तर माहिती दिली. २०२४-२५ या वर्षांत शैक्षणिक पात्रते नुसार सफाई कर्मचा-यांपैकी ६९ कर्मचा-यांना मुकादम, ११ कर्मचा-यांना सॅनिटरी इन्स्पेक्टर या पदावर, १७ सफाई कर्मचा-यांना लिपिक या पदावर आणि ८ सफाई कर्मचा-यांना लेखा लिपिक या पदावर पदोन्नती दिली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

त्याप्रमाणे सफाई कर्मचा-यांना त्यांच्या समस्यांचे निराकरण शीघ्र गतीने करण्याकामी तसेच सफाई कामगारांच्या समस्या विचारात घेऊन त्यांचे नियोमोचित निराकरण करण्यासाठी प्रत्येक महिन्यांच्या चौथ्या मंगळवारी "सफाई मित्र दरबार" आयोजित करण्यासंदर्भात प्र. कामगार कल्याण अधिकारी सुनील बागुल यांना प्राधिकृत करण्यात आले असून तशा आशयाचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले असल्याबाबत माहिती देखील उपायुक्त वंदना गुळवे यांनी यावेळी दिली.*

# कुष्ठरोग जनजागृती रॅली चे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ भिवंडी(प्रतिनिधी) :
राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमानिमित्त भिवंडी महानगरपालिकेच्या शांतीनगर उर्दू माध्यमिक विद्यालय येथे कुष्ठरोग जनजागृती रॅली चे आयोजन माननीय आयुक्त श्री. अजय वैद्य भिवंडी मनपा व माननीय उप. आयुक्त( शिक्षण ) डॉ. अनुराधा बाबर भिवंडी मनपा ,आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप गाडेकर सर भिवंडी मनपा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित श्री प्रकाश राठोड साहेब सहाय्यक आयुक्त (शिक्षण विभाग) व श्री नितीन पाटील प्रशासनाधिकारी प्राथमिक शिक्षण माध्यमिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ सौ किशोरी ठाकूर मॅडम, आरोग्य विभागाचे क्षयरोग व कुष्ठरोग अधिकारी डॉ बुशरा सय्यद मॅडम तसेच ना.आ.केंद्र नदीनाका वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी शाळेतील ४५० विद्यार्थ्यांना कुष्ठरोगा विषयी माहिती देऊन रॅली काढण्यात आली. यावेळी शिक्षक व आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. रॅली चे आयोजन शांतीनगर उर्दू माध्यमिक विद्यालय व वैद्यकीय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते.

# केडीएमसीमध्ये 'मराठी भाषा पंधरवडा' साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :
शासनाच्या निर्देशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतही "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. या पंधरवडयाचा शुभारंभ दि.१७ जानेवारी रोजी सायंकाळी डोंबिवली पूर्व येथील गावदेवी उदयानात संपन्न झाला. यावेळी उपस्थित खासदार श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे तसेच महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी या उदयानात उपस्थित असलेल्या नागरिकांना आणि मराठी भाषा पंधरवडयाच्या अनुषंगाने



सांस्कृतिक कार्यक्रमाचे बहारदार सादरीकरण करणा-या महाविदयालयीन विदयार्थ्यांना "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्त शुभेच्छा दिल्या. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात महापालिका अधिकारी कर्मचा-यांचा देखील जास्तीत जास्त सहभाग वाढावा या दृष्टीकोनातून महापालिकेने अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी मराठी गीत गायन, मराठी हस्ताक्षर स्पर्धा, चारोळी स्पर्धा आणि महापालिकेच्या शालेय विदयार्थ्यांसाठी मराठी निबंध स्पर्धा, म्हणी ,वाकप्रचार स्पर्धा इत्यादी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. यापैकी दि.२१ रोजी आयोजित करण्यात आलेली मराठी गीत गायन स्पर्धा, आज दि.२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मराठी हस्ताक्षर स्पर्धेस महापालिका अधिकारी कर्मचारी वर्गाने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. *मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा सांगता सोहळा दि.२८ जानेवारी रोजी कल्याण पश्चिम येथील सिटी पार्क येथे संपन्न होणार असल्याची माहिती मराठी भाषा अधिकारी किशोर शेळके यांनी दिली आहे.*

# उल्हासनगर मनपात सावित्रीबाई फुले जयंती सोहळा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ उल्हासनगर(प्रतिनिधी) :
उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत दिनांक ०३/०१/२०२५ क्रांतीवीर सावित्रीबाई ज्योतीबा फुले जयंती निमित्त, दिनांक २१/१/२०२५ रोजी दुपारी ०१.०० ते ४.०० सिंधु भवन, प्रभाग समिती क्र. २ जवळ, उल्हासनगर ३ येथे सांस्कृतिक कार्यक्रम व मान्यवर महिलांचा परिसंवाद मेळाचा आयोजित करुन जयंती भव्य स्वरूपात साजरी करण्यात आली. उल्हासनगर शहरातील महिलांनी उत्साहाने व आनंदाने सहभाग घेतला व कार्यक्रमाचे सुत्र संचालक सी. सविता हांडे व त्यांचे सहकारी यांनी केले. सदर कार्यक्रम मा. आयुक्त तथा प्रशासक श्रीम, मनिष आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेन घेण्यात आला. कार्यक्रमात सहाय्यक आयुक्त, महिला




व बालकल्याण विभाग कु. मयुरी कदम तसेच महापालिका जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, NULM विभाग प्रमुख श्रीम. संजिवनी अमृतसागर, विभाग प्रमुख पर्यावरण विभाग श्री. दत्तात्रय जाधव, विभाग प्रमुख (दिव्यांग विभाग) श्री. राजेश घनघाव, विभाग प्रमुख (महिला व बालकल्याण) श्री. नितेश रंगानी उपस्थित होते. मा. सहाय्यक आयुक्त (मबाकवि) यांनी महिलांना स्त्री जिवनाचे महत्व, महिलांच्या आरोग्य व स्वास्थ्याकडे जास्तीत जास्त लक्ष तसेच शहरातील साफ-सफाई ओला कचरा-सुका कचरा वर्गीकरण करुन शहरात शुन्य कचरा योजना राबविण्यासाठी मदत होईल, असे प्रेरणादायक व सकारात्मक मार्गदर्शन केले. व कार्यक्रमात कर्तृत्ववान महिलांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# दिव्यांगजनांना साहित्य वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ उल्हासनगर(प्रतिनिधी) :
उल्हासनगर महानगरपालिका व समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद ठाणे अणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को) यांच्या संयुक्त विद्यमानाने कल्याण लोकसभा मतदार संघामधील उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग प्रमाणपत्र धारक व ६० वर्षावरील जेष्ठ नागरीक यांना अवाहन करण्यात येते की, शुक्रवार दि. २४/०१/२०२५ रोजी सकाळी १०:०० ते ५:०० वा. यावेळेत गोलमैदान रोटरी मिड टाऊन हॉल, उल्हासनगर-१ येथे ADIP योजने अंतर्गत दिव्यांगजनांना व RVY योजने अंतर्गत जेष्ठ नागरीकांना खालील साहित्य मिळणार आहे.
अस्थिव्यंग, बहुविकलांग, सेरेबल पाल्सी, कर्णबधिर, पुर्णतः अंध ADIP योजने अंतर्गत अपंग व्यक्तींसाठी उपलब्ध साहित्यः- तीन चाकी सायकल, व्हिल चेअर, बॅटरीवर चालणारी मोटाराइज्ड तीन चाकी सायकल, कुबड्या, वॉकींग स्टिक, सीपी चेअर, बीटीई श्रवणयंत्र, वेल केन, ब्रेल स्लेट, ब्रेल किट, सुगम्य केन, स्मार्ट फोन, कृत्रिम अवयव, कॅलिपर इत्यादी
ADIP योजनेअंतर्गत दिव्यांगजनांकडून सोवत आणावयाची कागदपत्रेः-
१. अपंगत्व दर्शविणारे एक फोटो
२. आधारकार्ड/आधार नोंदणी पावती
३. UDID कार्ड किंवा अपंगत्व प्रमाणपत्र किमान ४०% व UDID साठी नोंद केलेली नोंद पावती
४.उत्पन्नाची प्रत (सर्व श्रोताकडून मासिक उत्पन्न रू. २२,५००/ पेक्षा जास्त नसावे. (महसूल विभाग/बीपीएल रेशनकार्ड प्रत/अपंगत्व प्रमाणपत्राची प्रत मा. खासदार/मा. आमदार/जिल्हा परिषद / ग्रामप्रधान सरपंच इ. प्रमाणपत्र)
५. दृष्टीहीन लाभाच्या बाबतीत शैक्षणिक नांव नोंदणीचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/ बोनाफाईड) ६० वर्षावरील जेष्ठ नागरीक
A RVY योजने अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध साहित्यः- व्हिलचेअर, कमोडसह व्हिलचेअर, कमोड खुर्ची, कुबड्या, चालण्याची काठी, ट्रायपॉड, टेट्रापॉड, चष्मा, बीटीई श्रवणयंत्र, ग्रीवा कॉलर, गुडघा बेस, डेन्चर, एल एस बेल्ट इत्यादी, पालघर
RVY योजनेअंतर्गत जेष्ठ नागरीकाकडून सोबत आणावयाची कागदपत्रे :-
१. एक छायाचित्र
२. आधारकार्ड/आधार नोंदणी पावती
३. उत्पन्नाची प्रत (सर्व श्रोताकडून मासिक उत्पन्न रु. १५,०००/ पेक्षा जास्त नसावे. (महसूल विभाग/बीपीएल रेशनकार्ड प्रत/अपंगत्व प्रमाणपत्राची प्रत/मा. खासदा/मा. आमदार जिल्हा / परिषद/ग्रामप्रधान सरपंच इ. प्रमाणपत्र)
सदर दिवशी फक्त लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. तरी सर्व दिव्यांग व जेष्ठ नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपण सदर योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाच्या वतीने करण्यात येत आहे



## पु.भा.भावे व्याख्यानमाले अंतर्गत 'आनंद यात्रा' कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :
भावना व्यक्त करायला शिका जी माणस कधी व्यक्त होत नाही त्यांना विविध प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागते. तसेच माणसाचा माणसाशी संवाद तुटत चालला आहे म्हणून समाजामध्ये आत्महत्येच प्रमाण वाढलं आहे कारण माणूस एकटा पडत चलला आहे असे मत सादरकर्ते एकपात्री कलाकार प्रसाद कुलकर्णी यांनी व्यक्त केले. सार्वजनिक वाचनालय कल्याण व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा.भावे व्याख्यानमाले अंतर्गत आयोजित "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्ताने 'आनंद यात्रा' कार्यक्रम प्रसंगी मनामनावर आनंदाची अत्तरदाणी शिंपडणारा, धमाल एकपात्री कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले की, आयुष्य खूप सुंदर, अनमोल गिफ्ट आहे ते जगायला शिका नाही तर शेवटच्या क्षणी आख्या आयुष्याचा पट समोर दिसेल आपण जगण्यासाठी आलो होतो पण आपण जगलोच नाही ही खंत राहिल. तुम्ही जे पेरता तेच उगवते प्रवाह चालू आहे. या प्रवाहात माणसं चांगली किंवा वाईट भेटतील हे आपल्या हातात नाही पण माणसाकडे पाहण्याचा दृष्टीकोण महत्वाचा आहे. नेरगलकर, कार्यकारीणी सदस्य अरविंद शिंपी, विजयसिंह परदेशी, ग्रंथसेविका वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जोगेश्वरी मोर्चाला हिंसक वळण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) :
जोगेश्वरी पूर्व येथील सुभाष रोड लगत रेल्वे रेषांच्या बाजूला असलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी आज सकाळी त्यांच्या हक्कांसाठी "बिराड मोर्चा" काढला. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या शांततापूर्ण आंदोलनाचा उद्देश झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाच्या मागण्या मांडणे आणि सरकार व रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधणे हा होता.
मोर्चामध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक, तसेच लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. मात्र, मोर्चा पुढे जात असताना पोलिसांनी अचानक लाठीचार्ज केला, ज्यामुळे अनेक महिला आणि जेष्ठ नागरिक जखमी झाले. पोलिसांनी काही आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले असून त्यांना जोगेश्वरी पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे.

नागरिकांचा आरोप: शांततेवर गदा

पोलिसांनी आंदोलनकर्त्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता लाठीचार्ज केला, असा आरोप आंदोलनकर्ते यांनी केला आहे. "शांततेने मोर्चा काढणाऱ्या महिलांवर आणि वृद्धांवर अनावश्यक जबरदस्ती करण्यात आली. हा आमच्या लोकशाही हक्कांना दाबण्याचा प्रयत्न आहे," असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.
मागण्या आणि निवेदन

झोपडपट्टीवासीयांनी पुढील मागण्या मांडल्या:

1. शांततेने आंदोलन करण्याचा अधिकार अबाधित ठेवावा.
2. लाठीचार्ज करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी.
3. झोपडपट्टीतील नागरिकांच्या पुनर्वसनाच्या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात.

आंदोलनकर्त्यांचे निवेदन असे होते: "आम्ही कोणत्याही प्रकारची हिंसा केली नाही. हा मोर्चा केवळ आमच्या मूलभूत हक्कांसाठी होता. पोलिसांचा लाठीचार्ज हा लोकशाही मूल्यांवर आघात करणारा आहे. आम्हाला न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील."

नागरिकांमध्ये संतापाची लाट

लाठीचार्जनंतर परिसरात संतापाचे वातावरण पसरले आहे. मोर्चाचे आयोजक पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी बैठक घेत आहेत. यासंदर्भात लवकरच अधिकृत तक्रार दाखल केली जाणार आहे.

# अंबरनाथ मशीद ट्रस्टची निवडणूक संपन्न

## प्रशासनिक कडक बंदोबस्तात मतदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
अंबरनाथ(प्रतिनिधी) :
अंबरनाथ, महाराष्ट्र वक्फ बोर्ड छत्रपती संभाजीनगर संचलित अंबरनाथ मुस्लीम जमातीच्या निवडणुका वक्फ बोर्डाच्या नवीन निवडणूक समितीच्या देखरेखीखाली १९ जानेवारी रोजी शांततेत पार पडल्या. पोलिस प्रशासनाची कडक शिस्त आणि मतदारांची सजगता आणि तिन्ही पॅनलचे कामकाज शांततेत पार पडले. अंबरनाथ मुस्लिम जमातच्या इतिहासातील ही पहिलीच निवडणूक होती जी बॅलेट पेपरच्या आधारे झाली. अंबरनाथ पश्चिमेकडील कोहोजगाव येथील प्रसिद्ध हजरत गबनशाह वली दर्गा संकुलात सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत झालेल्या मतदानात ८.२५५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण ४३२६ मतदार असून त्यापैकी ३५७२ नोंदणीकृत मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.
मतदारांसाठी ११ बुथ तयार करण्यात आले होते. वक्फ बोर्डाने गठित केलेल्या निवडणूक समितीच्या देखरेखीखाली ही निवडणूक अंबरनाथमधील मुस्लीम समाजात चर्चेचा विषय बनली होती. ज्याचे निवडणूक अधिकारी ॲड. अल्ताफ शेख यांची मंडळाने नियुक्ती केली होती. निवडणूक निरीक्षक खुसरो खान होते.
अंबरनाथ मुस्लीम जमातच्या या निवडणुकीत तीन पॅनलने नशिबाची आणि ताकदीची चाचपणी केली. प्रत्येक पॅनलमध्ये १५ सदस्यांची टीम असते. आवार पॅनलचे निवडणूक चिन्ह बिह कूलर असून सदरातचे दावेदार हाजी सालीन जिंदवली चौधरी, खिदमत पॅनलचे निवडणूक चिन्ह ऑटो रिक्षा आणि सदरतचे उमेदवार माजी नगरसेवक मेहमूद मोरा सैजाद आणि मोमीस युश फाऊंडेशनचे निवडणूक चिन्ह चिह मशाल असून सदरात क्युलर सिडकोचे निवडणूक चिन्ह होते.
या निवडणुकीत महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. सय्यद मुहम्मद अमान अली हा अपंग युवक मतदानासाठी येत असताना निवडणूक निरीक्षक खुसरो खान यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. अंबरनाथचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. १० पोलीस अधिकारी व ४० पोलीस कर्मचारी कर्तव्यावर तैनात होते. दर्ग्याजवळ निवडणूक कार्यालय उभारण्यात आले असून आज सकाळी नऊ वाजल्यापासून मतमोजणी पूर्ण होणार आहे.

# बदलापूर नगरपरिषद निवडणुकीसाठी
## काँग्रेसची मोर्चे बांधणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
बदलापूर(प्रतिनिधी) :
येत्या काळात कुळगाव- बदलापूर नगरपरिषद निवडणूक होणार असून या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अधिकाधिक नगरसेवक निवडून येण्यासाठी कार्यकर्त्यांनी कंबर कसावी व आतापासूनच कामाला लागावे असे आवाहन ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी आज बदलापूर येथे केले.
बदलापूर येथील शहर काँग्रेसच्या कार्यालयात आज काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक दयानंद चोरघे यांच्या अध्यक्षतेखाली ब्लॉक अध्यक्ष संजय जाधव यांनी आयोजित केली होती. त्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना दयानंद चोरघे म्हणाले की नुकताच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएम घोटाळा असून सत्ताधारी पक्षांनी सत्तेचा गैरवापर करून सत्ता मिळवली आहे, ही सत्ता सामान्य जनतेच्या मताने मिळाली नसून ईव्हीएम घोटाळ्याने मिळाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला धडा शिकवण्यासाठी जनता सज्ज झाले असून आता काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनीही कंबर कसण्याची गरज असून काँग्रेस सरकारने केलेले कार्य व महायुतीचे अपयश लोकांसमोर मांडून महागाई, बेरोजगारी यांचा जाब विचारण्यासाठी घराघरात प्रचार करावा असे आवाहनही दयानंद चोरघे यांनी केले आहे. त्याचबरोबर शहरांमध्ये लाडकी बहीण योजनेचा किती गरजू महिलांना लाभ भेटला नाही व महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी गोलमाल करून गरजवंत नसलेल्या किती महिलांना लाभ दिला आहे याचा सर्वेही महिलांनी करावा असे आवाहन दयानंद चोरघे यांनी महिला काँग्रेसला केले आहे. पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच आपापल्या वार्डामध्ये प्रचार करण्यास सुरुवात करावी, मी अध्यक्ष म्हणून खंबीरपणे आपल्या सोबत असल्याचे आश्वासनही दयानंद चोरघे यांनी कार्यकर्त्यांना दिले.
यावेळी शहराध्यक्ष संजय जाधव यांच्यासह इच्छुक उमेदवारांनी आपले मनोगत व्यक्त केले. आढावा बैठकीस शहर काँग्रेस कमिटीचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीपी रस्त्यावरून लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांमध्ये वादावादी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :
कल्याण पूर्वेतील ड वॉर्ड विभगात अनेक डिपी रस्ते युटिलिटी अभावी बनत असून, पोहच रस्ते आपुऱ्या अवस्थेत आहेत. तर गरजेचे अंतर्गत रस्ते अतिक्रमण होऊन नागरिकांची बोंबाबोंब आहे. या सर्व रस्ते विषयांवर कल्याण पूर्वेच्या आमदार सुलभा गायकवाड, शिवसेना कल्याण पूर्व विधानसभा प्रमुख प्रशांत काळे, माजी नगरसेवक मनोज राय, नवीन गवळी, अभिमन्यु गायकवाड, प्रमोद पिंगळे, नगरसेविका माधुरी काळे, राजवंती मढवी, भाजपा जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी आदींनी एकत्र येऊन कल्याण डोंबिवली महानगरपालिका शहर अभियंता परदेशी यांच्यासोबत बैठक झाली. यावेळी कल्याण पूर्वेतील डीपी रोडसाठी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांमध्ये खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाली.
कल्याण पूर्व उप अभियंता गोसावी यांच्यावर स्थानिक लोकप्रतिनिधी प्रश्नांचा भडिमार करून दिरंगाई कामांचा ठपका ठेवत त्यांना अनेक प्रश्नांचा भडीमार केला. पुणे लिंक रोड ते सम्राट हायस्कूल समोरून 100 फुटी रस्त्याला जोडणारा रस्ता कल्याणच्या विकासाच्या दृष्टीने अनेक रस्त्यांमधील एक रस्ता आहे. गेली अनेक वर्ष हा रस्ता होऊ शकला नाही. याबाबत शहर अभियंता आणि कल्याण पूर्वेतील उपस्थित लोकप्रतिनिधी यांनी रस्त्याची प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. रस्ता बनत असताना युटिलिटी अस्तित्वात नसल्याचे दिसून आलं. संबंधित विभागाकडून अतिक्रमण हटवून रस्ता करण्यात येईल असे आश्वासन यावेळी शहर अभियंता यांच्याकडून देण्यात आले.
कल्याण पूर्वेच्या खुंटलेल्या विकासाबाबत पालिका अधिकाऱ्यांवर कल्याण पूर्व आमदार सुलभा गायकवाड यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित प्रस्तावित रोड तात्काळ होण्याचे निर्देश महानगरपालिका शहर अभियंता यांना दिले. माधुरी प्रशांत काळे यांच्या प्रभागातून जाणाऱ्या हा रस्ता उत्तम दर्जाचा व्हावा या साठी शासनाकडून या कामासाठी मोठा निधी उपलब्ध होत असल्याचे शिवसेना विधानसभा प्रमुख प्रशांत काळे यांनी यावेळेस सांगितले. होणारे रस्ते हे अपुऱ्या नागरी सुविधांचे आहेत, त्यामध्ये पुढे हे रस्ते सिमेंट कॉंक्रीट झाल्यानंतर पुन्हा त्यांना खोदण्याची वेळ येऊ नये यासाठी नगरसेवक मनोज राय यांनी विषय मांडला.

# जेएनपीए विस्थापित कोळीवाडा ग्रामस्थ पुन्हा आक्रमक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उरण(प्रतिनिधी) :
जेएनपीए प्रशासन आणि केंद्र सरकारने वारंवार आश्वासन देऊनही पुनर्वसनाचा व नुकसान भरपाईचा प्रश्न जाणून बुजून प्रलंबित ठेवल्याने जेएनपीए विस्थापित कोळीवाडा ग्रामस्थांनी पुन्हा एकदा जेएनपीए बंदरात येणारी महाकाय मालवाहू जहाजांचा मार्ग बंद केला आहे. मंगळवारी रात्री ३ वाजता महिला व लहान मुलांसह ग्रामस्थांनी भर समुद्रात आंदोलन सुरू केले आहे. त्यानंतर पोलीस आणि प्रशासनाने आंदोलकांशी चर्चा सुरू केली आहे. मात्र आंदोलकानी प्रश्न सुटल्या शिवाय माघार घेणार नाही अशी भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कोळीवाडा गावात कडक बंदोबस्त ठेवला आहे. तसेच मोरा मार्गाने ये जा करणाऱ्या बोटी बंद केल्या आहेत. यापूर्वी अशाच प्रकारचे आंदोलन ग्रामस्थांनी केल्यानंतर केंद्र सरकार आणि जेएनपीए प्रशासनाने आश्वासन दिले होते. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. १९८४ ला जिल्हाधिकारी रायगड यांनी शेवा कोळीवाडा गावठाण देशातील आधुनिक बंदरासाठी संपादन करून तत्कालीन न्हावा शेवा बंदर प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा गावातील शेतकरी/बिगर शेतकरी २५६ कुटुंबांचे मौजे बोरीपाखाडी, उरण येथे १७.२८ हेक्टर भूखंडावर वसविण्यात आले होते. मात्र सद्या हे गाव १९९० पासून वाळवीग्रस्त आहे. त्यामुळे या गावातील नागरिक अनेक वर्षे जीव मुठीत घेऊन जीवन जगत आहेत.
शासनाच्या नियमानुसार कागदोपत्री पुनर्वसन व विस्थापितांना बंदर प्रकल्पात रोजीरोटीसाठी नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी मौजे बोरीपाखाडी, उरण येथील जमिनीवर शासनाचे मापदंडाने मंजूर केल्या नुसार दि.०८/०८/१९८५ रोजीचे नकाशात ७.१४ हेक्टर जमीन २५६ भूखंडासाठी दिली होती आणि १०.१४ हेक्टर जमीन नागरी सुविधेसाठी दिली होती. त्या नकाशात मुख्य रस्ते ४० फुट (१२ मीटर) रुंदीचे होते आणि जोड रस्ते ३० फुट (९ मीटर) रुंदींचे होते.जेएनपीटी (जेएनपीए )व्यवस्थापणांने फंड कमी दिल्याने जिल्हाधिकारी यांनी १७.२८ हेक्टर भूखंड न देता कमी भूखंडावर वसविण्यात आले आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी पुनर्वसनाचा सत्य अहवाल केंद्र व राज्य सरकारला देवून पाठपुरावा करून आजतागायत १७.२८ हेक्टर जमिनीत पुनर्वसन केलेले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे जानेवारी २०२५ मध्ये जेएनपीटी (जेएनपीए )च्या समुद्र मार्गात चॅनेल बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. चॅनेल बंद करण्यासाठी शेवा कोळीवाडा सामाजिक ग्रामविकास मंडळ व शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने हे आंदोलन सुरू केले आहे.

# म्हसा यात्रेत पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

## यात्रेत पाकोळी जुगार बंद ठेवल्याने मुरबाड पोलीसांचे विशेष अभिनंदन



## -पो.नि.संदीप गिते

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(प्रतिनिधी) :
तरूणाईला वेड लावणारा व जीवन बरबाद करणारा पाकोळी सारखा जुगार तालुक्यात मोठ्या प्रमाणात फोपावला आहे. क्रिकेटचे सामने, बैलगाडा शर्यतीच्या अड्डयावर या जुगाराचे एजंट खुलेआम पोलीसांच्या डोळ्यादेखत राजरोसपणे हा धंदा करत असताना त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नव्हती. प्रसिद्ध ऐतिहासिक म्हसोबा यात्रेतही पाकोळी खेळ दरवर्षी मोठ्या प्रमाणात सुरू असायचा यामध्ये अनेक वयोवृद्धांपासून तरूण, लहान शाळेय मुले देखील यात सामिल असायचे परंतु मुरबाड पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक संदीप गिते यांनी यावर्षी धाडसी निर्णय घेऊन पाकोळी व अन्य अवैध धंदे बंद ठेवल्याने त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशाच प्रकारे तालुक्यात इतरत्र चालणारे जुगाराचे अड्डे,पाकोळी सारखे खेळ बंद पाडावेत अशी अपेक्षा पो.नि.संदिप गिते यांच्या कडून जागरूक मुरबाडकर व्यक्त करत आहेत. तसेच म्हसा यात्रेत महिलांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य दिले असून महिला पोलीस अधिकारी यांची" दामिनी" पथकाच्या प्रमुख नेमणुक करण्यात आली असून या पथकाने म्हसा यात्रेत उत्कृष्ट काम केल्याचे दिसत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संदीप गिते यांनी दिली आहे.संपूर्ण म्हसा यात्रेत मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून पोलीसांच्या वेगवेगळया टिम तयार करण्यात आल्याने कोणताही अनुचित प्रकार झाला नसून म्हसा यात्रा शांततेत व सुरळीत पार पडली आहे. यात्रेत किरकोळ काही महिलांच्या पर्स,पाकीट हरविल्या होत्या त्या पुन्हा परत देण्यात आल्या असून दागिने हरविल्याची किंवा चोरल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही. शिवाय महिलांच्या छेडछाड विषयी कोणतीही घटना घडली नसल्याने यात्रा सुरळीत व शांततेत पार पडली असल्याने सर्व यात्रेकरुंचे, भाविकांचे मुरबाड पोलीसांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# नवी मुंबईतून महिनाभरात ११८ बांगलादेशींना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/नवी मुंबई(प्रतिनिधी) :
नवी मुंबईतील विविध २० पोलीस ठाण्यांमध्ये मागील महिन्याभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना पोलीसांनी अटक केली आहे. यामध्ये ५६ महिला आणि ५७ पुरुष आणि पाच बालके आहेत. संशयित बांगलादेशी नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी पोलीस अद्यापही संबंधित विभागाकडून करत आहेत. बांगलादेशी नागरिकांच्या अवैध वास्तव्यामुळे राज्य आणि देशावर होणारा परिणाम तसेच वाढत्या गुन्हेगारीमुळे सामान्य नागरिक त्रासले असून बांगलादेशींना पकडून त्यांना त्यांच्या देशात रवानगी करावी अशी मागणी विधिमंडळात भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. हे बांगलादेशी नागरिक विविध आठवडे बाजारांमध्ये व्यवसाय करत असून अशा अवैध आठवडी बाजारांवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांना २१ डिसेंबरपासून बांगलादेशी नागरिकांना अटक करण्याचे आदेश दिले.सर्वच पोलीस ठाण्यांच्या परिसरात आधारकार्ड, मतदान ओळखपत्र आणि महापालिकांचे जन्मदाखल्यांचे पुराव्यांची तपासणी करुन सूमारे ८०० हून अधिक संशयित बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी